# विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

(सामान्य प्रशासन विभाग)

Email ID- dcg.aurangabad@gmail.com Tel-०२४०-२३३१०८४


जा.क्र.२०१८/साप्र/संकीर्ण/कावि- दिनांक - १९.०६.२०१८

प्रति,

१) उपसंचालक, तंत्र ~~व उच्च~~ शिक्षण विभाग, औरंगाबाद.
२) उपसंचालक, उच्च माध्यमिक शिक्षण विभाग, औरंगाबाद.
३) उपसंचालक, माध्यमिक शिक्षण विभाग, औरंगाबाद.
४) उपसंचालक, प्राथमिक शिक्षण विभाग, औरंगाबाद.

**विषय- २१ जून, २०१८ रोजी "आंतरराष्ट्रीय योग दिन" साजरा करण्याबाबत.**

**संदर्भ-** १) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. संकीर्ण ३०१७/प्र.क्र.४१(II)/ क्रीयुसे १, दिनांक ०८.०६.२०१८

उपरोक्त विषयी शासनाने संदर्भ क्र. २ चे परिपत्रकान्वये दिनांक २१ जून, २०१८ रोजी चौथ्या आंतराष्ट्रीय योगदिनाचे आयोजन शाळा, महाविद्यालये, विद्यापिठे यामधील विद्यार्थ्यांकडून तसेच एन.एस.एस., नेहरू युवा केंद्र इ. युवा संघटनांमार्फत योगा संबंधी कार्यक्रम, योगा उत्सव, चर्चासत्र, कार्यशाळा, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादीचे आयोजन करण्याबाबत शासनाने निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालये, विद्यापिठे इत्यादींमध्ये वरीलप्रमाणे कार्यक्रम साजरा करण्याबाबत आपले स्तरावरुन सर्व संबंधीतांना कळविण्यात यावे. जिल्ह्यातील युवा वर्ग तसेच सर्वसामान्य व्यक्ती यांना कार्यक्रमात सहभागी करुन घेवून कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आपण पुढाकार घ्यावा. संदर्भ क्र. २ चे परिपत्रकात नमूद केल्यानुसार www.ayush.gov.in या संकेतस्थळावर आंतरराष्ट्रीय योगदिनाच्या आयोजना संदर्भात माहिती व सुचना दिलेल्या आहेत. त्यानुसार सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्याच्या सुचना द्याव्यात.
**(मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या निर्देशानुसार)**

**विभागीय आयुक्त/औरंगाबाद करिता**

पृष्ठांकन क्र.विकाऔ/शिक्षण/२०१८/2062
दिनांक :- 20 JUN 2018

या कार्यालयाच्या अधिनस्त येत असलेल्या शासकीय /अशासकीय, अनुदानित/विनाअनुदानित पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थांना सुचित करण्यात येते की,दि २१ जुन २०१८ रोजी **चौथ्या आंतरराष्टीय योगदिनाचे** आयोजन संदर्भीय पत्रात दिलेल्या निर्देशा प्रमाणे करावे व त्यांचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना प्रत देण्यात येवून सुचित करण्यात येते की, सदरील पत्र या कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.